Bhartiya Shikshan Sanstha's

# SHRI DNYANESH

## MAHAVIDYALAYA, NAWARGAON

Junior, Senior (UG, PG & PhD.)
Arts & Science
Re-accredited by NAAC : Grade A (CGPA 3.07)
(ISO - 9001:2015)





## स्व.बालाजी पाटील बोरकर
### संस्थापक अध्यक्ष

# भारतीय शिक्षण संस्था नवरगाव

## संचालक मंडळ

श्री.जयंत रा.बोरकर — अध्यक्ष

श्री.सदानंद प.बोरकर — सचिव

### संचालक मंडळ – सदस्य

श्री.सुखदेव आ.आनंदे    डॉ.देवराव वि. बोरकर    श्री.कृष्णाजी गो. सहारे

श्री. मोरेश्वर कु.ठिकरे    श्री.सुधाकर रा. बोरकर    श्री.सिद्धार्थ स. बोरकर    सौ.राधाबाई सां.गहाणे

# संस्थेचे मनोगत

'शिक्षण' ही फार व्यापक अशी संज्ञा आहे. प्राचीन काळापासून मुलभुत गरजा भागविण्यासाठी आपल्या जीवनात शिक्षणाने आमुलाग्र बदल घडवून आणले. हे बदल घडवून आणण्याची तळमळ आणि जिद्द ज्या व्यक्तींमध्ये होती अशा व्यक्तींच्या कर्तृत्वामुळेच शिक्षणाचा प्रसार झाला. त्यामुळे तळागाळातल्या गरीब अशिक्षित व्यक्तींना शिक्षित समाजासोबत मुख्य प्रवाहात येता आलं. श्रध्देय बालाजी पाटील बोरकर हे त्या व्यक्तींपैकी एक. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच परिसरातील ग्रामीण तरुणांच्या शिक्षणाचा विचार त्यांच्या डोक्यात आला. स्वतः फक्त चौथा वर्ग उत्तीर्ण असलेल्या बावाजींना अशिक्षित समाजाला शिक्षित करण्याची किती तळमळ होती हे यावरुन स्पष्ट होते. शिक्षण म्हणजे भोवतालच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी समरस होण्याची पात्रता मुलांच्या अंगी आणून देणे, असे त्यांचे विचार होते. त्या विचारांनी प्रेरित होऊनच संघविचारांच्या कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत १९५० साली त्यांनी नवरगाव येथे भारतीय शिक्षण संस्थेची स्थापना केली. भारत विद्यालय नवरगाव, भारत विद्यालय पळसगाव (जाट), भारत प्राथमिक विद्यालय नवरगाव, भारत वसतीगृह नवरगाव अशा घटकसंस्थांना जन्म दिल्यानंतर उच्च शिक्षणाची सोय झालीच पाहिजे हा विचार बावाजींच्या डोक्यात घोंघाऊ लागला आणि १९६८ साली श्री ज्ञानेश महाविद्यालयाच्या रुपानं एक स्वप्न पुर्णत्वास आलं. ते पुर्ण करण्यासाठी बावाजींना स्वतःचं घरसुध्दा गहाण ठेवावं लागलं.

संस्थेचे तत्कालीन सचिव स्व. श्री मनोहरराव देशपांडे यांचा संस्थेच्या व महाविद्यालयाच्या उभारणीत आणि विकासात मोलाचा वाटा आहे. महाविद्यालयाचं आजचं बदललेलं चित्र कितीही सुंदर आणि प्रगत असलं तरी भुतकाळाच्या चौकटीशिवाय ते चित्र पुर्ण होऊ शकलं नसतं. तत्कालीन प्राचार्य स्व. रामभाऊजी घाटोळे यांच्या संस्काराने हे महाविद्यालय 'पसायदान' गाऊ लागलं, तर प्राचार्य स्व. जयंतराव बरडे यांच्या काळात ते नाचायला लागलं, आदर्श महाविद्यालय म्हणून स्वतःची ओळख निर्माण करु शकलं.

उत्तम नागरिक तयार करण्याचा ध्यास या पिढीतील अध्यापकांनी घेतला आहे. नवी उर्मी, नवा जोश उराशी बाळगून विद्यार्थ्यांमधील आंतरिक शक्ती बाहेर काढून त्याचा विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न महाविद्यालयात होतो याचा संस्थेला अभिमान आहे. या सर्व प्रयत्नात विद्यमान प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे यांचे पाठबळ आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली सहकारी प्राध्यापकांच्या योगदानामुळे महाविद्यालयाच्या प्रगतीचा अश्वमेध धावतो आहे. परिणामतः सर्वांच्याच परिश्रमामुळे महाविद्यालयाला नॅकचा 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे.

आज महाविद्यालयाला ISO नामांकन मिळाले. केंद्रीय अटल रॅंकींगमध्ये महाविद्यालयाला स्थान मिळाले. १२० संख्येने सुरु झालेली महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या १८०० च्या घरात पोहचली ही अभिमानाचीच बाब आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जे जे करावं लागेल ते सर्व करण्याची व त्यासाठी महाविद्यालयीन प्रशासनाच्या मागे मजबूत भिंतीप्रमाणे उभे राहण्याची संस्थेची तयारी आहे.

जगविख्यात तत्ववेत्ता प्लेटोच्या मते ''सत्य, शिव आणि सुंदर ही मानवाच्या जीवनाची अंतिम मुल्ये आहेत, ती समजण्याची किंवा अनुभवण्याची पात्रता मनुष्याला आणून देते, ते खरे शिक्षण.'' असे शिक्षण आमच्या श्री ज्ञानेश महाविद्यालयातून ज्ञानदानाच्या रुपानं विद्यार्थ्यांना मिळत राहील.

धन्यवाद!



**श्री. जयंत रा. बोरकर**
अध्यक्ष
भारतीय शिक्षण संस्था, नवरगाव



**श्री. सदानंद प. बोरकर**
सचिव
भारतीय शिक्षण संस्था, नवरगाव



# प्राचार्यांचे मनोगत

मागील झालेल्या NAAC पुनर्मूल्यांकनात श्रेणी 'अ' (३.०७) प्राप्त करुन श्री ज्ञानेश महाविद्यालयाने गोंडवाना विद्यापीठात प्राप्त केलेला गौरव महाविद्यालयाच्या उच्च परंपरेला साजेसा आहे. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात गुणवत्तेच्या क्षेत्रात महाविद्यालयाची प्रगती या श्रेणी मुळे सिद्ध झालेली आहे. एवढेच नाही तर राष्ट्रीय पातळीवरील अटल रँकिंगमध्ये महाविद्यालयाचे नाव १७१ क्रमांकावर पोहचले आहे. हे यश आमची गुणवत्ता सिद्ध करते.

आपल्या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा ही महत्त्वाची बाब आहे. कला व विज्ञान शाखेतील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा निकालाचा आलेख दरवर्षी वाढतोच आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील निकाल ९४.००% असा भक्कम लागलेला आहे. पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यापीठाचा निकाल पाहता विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत दरवर्षी आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी आघाडीवर असतात. या वर्षी सुद्धा विद्यापीठाच्या निकालात आपल्या महाविद्यालयाचे नाव अग्रेसर आहे. क्रीडा व सहशैक्षणिक स्पर्धांमधील विद्यार्थ्यांना मिळणारी बक्षिसे ही महाविद्यालयाचा सन्मान वाढवण्यास अधिक मदत करीत आहेत. क्रमिक शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना स्वयंनिर्भर करुन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. अधिक रोजगाराभिमुख कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम विद्यापीठाची मान्यता मिळवून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. संशोधन उबवन केंद्र (Incubation Centre), विविध उद्योगक्षेत्र व समाजसेवी, संस्थांशी सामंजस्य करार करून विविध घटकांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना संशोधन व रोजगार क्षेत्रात पुढे जाण्याकरता प्राविण्य प्राप्त करण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालय प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुखकर, गुणवत्तापूर्ण करण्यासाठी महाविद्यालयात विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. विज्ञान विषयाच्या समृद्ध प्रयोगशाळा, नॅनो सायन्स संशोधन केंद्र, वातानुकूलित भव्य पसायदान सभागृह, मुलींचे सर्व सुविधायुक्त वसतीगृह, स्पर्धा परीक्षेसाठी २४ तास अभ्यासिका, अद्ययावत कॉन्फरन्स हॉल, विद्यार्थ्यांसाठी पुरेशा वर्गखोल्या, इंग्रजी भाषा प्रयोगशाळा, संगणक केंद्र, समृद्ध संगणकीकृत ग्रंथालय, खेळासाठी भव्य क्रीडांगण, प्रसाधनगृह व शुद्ध पिण्याचे गार पाणी, निसर्गरम्य परिसर या संपूर्ण सुविधांमुळे श्री ज्ञानेश महाविद्यालय अधिकाधिक विद्यार्थ्यांचे आकर्षण केंद्र बनले आहे. येणाऱ्या वर्षात संगणक विज्ञान व गृहअर्थशास्त्र तसेच आणखी काही विषयात पदव्युत्तर विभाग सुरू करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सत्र २०२३-२४ पासून संपूर्ण देशभर लागू करण्यात येत आहे. देशातील प्रत्येक युवक आत्मनिर्भर व्हावा या हेतुने संपुर्ण देशभर ग्रामिण आणि शहरी भागात प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक प्रशिक्षणासाठी एक व्यापक आराखडा तयार करण्यासाठी या क्षेत्रातील होणाऱ्या बदलाच्या साथीला साथ देऊन महाविद्यालयाने या अनुषंगाने विद्यार्थ्यांला हव्या त्या अभ्यासक्रमाची तरतूद करण्याचा प्रयत्न केला आहे.

आपण यावर्षी श्री ज्ञानेश महाविद्यालयात प्रवेश घेऊन समृद्ध शैक्षणिक परंपरेचा घटक होऊ इच्छिता, त्या निमित्ताने महाविद्यालयात मी आपले मनःपूर्वक स्वागत करतो.

धन्यवाद !

**डॉ. सुरेश बाकरे**
प्राचार्य

# महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये

**श्री ज्ञानेश महाविद्यालयात प्रवेश का घ्यायचा ?**

१. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचे ध्येय जोपासणारा अभ्यासू, व्यासंगी, मनमिळावू व उच्च विद्याविभूषित प्राध्यापक वर्ग.

२. सुसज्ज व अद्ययावत ग्रंथालयात जवळपास ३० हजार विविध विषयाचे पुस्तक, डिजिटल लायब्ररी आणि स्वतंत्र अभ्यास कक्ष.

३. विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट जोडणीसह स्वतंत्र संगणक कक्ष, वाय-फाय कॅम्पस व झेरॉक्स व्यवस्था.

४. गोंडवाना विद्यापीठातील एकमेव महाविद्यालय जिथे विज्ञान विषयाच्या उत्कृष्ट व अद्यावत तांत्रिक उपकरणांसह सुसज्ज प्रयोगशाळा.

५. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील उत्कृष्ट निकालाची परंपरा.

६. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मूलभूत सुविधांची स्वतंत्र उभारणी.

७. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ते सोबतच व्यक्तिमत्व विकासाकरता विविध उपक्रम राबविण्यात अग्रेसर.

८. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा मार्फत विविध मार्गदर्शन कार्यशाळा, विविध प्रेरणादायी व्याख्याने, दरवर्षी आयोजित केली जातात. आत्तापर्यंत केंद्रातील ४० विद्यार्थ्यांची विविध सरकारी सेवेत निवड.

९. सर्व सुविधा युक्त मुर्लींचे निशुल्क वसतीगृह (फक्त खानावळीचे शुल्क भरावे लागते.)

१०. दरवर्षी विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, विविध खेळांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, विद्यापीठाच्या क्रीडा चमूत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड.

११. विद्यापीठस्तरीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्वरूपाच्या विविध शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन.

१२. महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या गुणवत्ता विकासाकरता विविध कार्यशाळा व व्याख्यानांचे आयोजन.

१३. विद्यार्थी कर्मचारी व प्राध्यापक वर्ग यांच्याकरिता विशिष्ट गणवेश व शिस्तीच्या अनुपालनाकडे विशेष लक्ष.

१४. पर्यावरणीय संवेदना, निसर्ग संवर्धना सोबतच सामाजिक जाणीव जागृती करिता विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन.

१५. महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थिनींसाठी विशेष कक्ष, सर्व सोयीयुक्त प्रसाधनगृह, विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महिला तक्रार निवारण कक्षासह तक्रार पेटी उपलब्ध.

१६. अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर लावलेल्या सुसज्ज वर्गखोल्यांची उपलब्धता.

१७. सर्व विषयांच्या अतिरिक्त तासिका व संपूर्ण अभ्यासक्रमाचे वर्गातील अध्यापन, कठीण पातळीच्या विषयाचे अतिरिक्त तास घेतले जातात.

१८. निसर्गरम्य परिसर, पर्यावरण पूरक वातावरण, भव्य खेळाचे मैदान व देखणे व रुचकर नाश्त्याची व्यवस्था असणारे उपहारगृह महाविद्यालयाच्या प्रांगणात आहे.

१९. विद्यार्थ्यांच्या आर्थिक समस्या लक्षात घेऊन जसे की प्रवेश, परीक्षा शुल्क, आजार, अपघात किंवा सायकल इत्यादीसाठी विद्यार्थी कल्याण निधीच्या माध्यमातून होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना दरवर्षी आर्थिक मदत

२०. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, आरोग्य मार्गदर्शन व सल्ला शिबिरांचे आयोजन, दरवर्षी रक्तदान शिबिर घेऊन समाजाला योगदान.

२१. कृषी पार्श्वभूमी असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी गांडूळखत निर्मिती प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध.

२२. राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र या कला शाखेतील व रसायनशास्त्र पदार्थविज्ञान व वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र या विज्ञान शाखेतील विषयात पदव्युत्तर प्रवेश सुरु आहे. पदव्युत्तर वर्गासाठी स्वतंत्र वर्गखोल्या, नियमित तास सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळेची उपलब्धता.

२३. ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजी मध्ये संभाषण करणे सुलभ व्हावे यासाठी इंग्रजी भाषा प्रयोगशाळा.



## गोंडवाना विद्यापीठ गीत

गोंडवाना नव तपोवन आदिजन वन परिसरी
विश्वविद्यापीठ हे ज्ञानार्चना या मंदिरी।।धृ।।
स्रोत आदिम संस्कृतीचा या प्रदेशी निर्मळ
शास्त्र, विद्या अन् कलेतून अमृताचे ओहळ
त्या झऱ्यांना करुनि विकसित मिळवू विद्यासागरी।।१।।
शास्त्र, वाङ्मय, तंत्रविद्या व्यावसायिक ज्ञानही
अर्थ वा वाणिज्य, क्रीडा अन् कला विज्ञानही
नित इथे बहरेल प्रतिभा नवयुवांच्या अंतरी।।२।।

## महाराष्ट्र गीत



जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!
रेवा, वरदा, कृष्ण, कोयना, भद्रा, गोदावरी,
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी.
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा!
जय महाराष्ट्र माझा!
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!
भीती न आम्हा तुझी मुळी ही, गडगडणाऱ्या नभा.
अस्मानाच्या सुलतानीला जवाब देती जीभा.
सह्याद्रीचा सिंह गर्जतो ।। शिवशंभू राजा,
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा!
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!
काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी,
पोलादी मनगटे खेळती खेळ जीवघेणी.
दारिद्र्याच्या उन्हात शिजला, निढळाच्या घामाने भिजला,
देशगौरवासाठी झिजला दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा!
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!
गर्जा महाराष्ट्र माझा!

## भारतीय संविधान उद्देशिका

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता;निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठाव राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून;
आमचा संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे
संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.



## सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांसाठी सूचना

(अ) **भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना**

ही अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता लागू आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणपत्रे व दाखले जोडणे आवश्यक आहे.

१) आवेदनपत्र परिपूर्ण भरलेले असावे.

२) शाळा सोडल्याचा दाखला, मूळ टी.सी. आवश्यक आहे. डूप्लिकेट टी.सी.बाबत दोन ठिकाणी प्रवेश घेतला नसावा तसेच मूळ टी.सी. का सादर करू शकत नाही याबाबत शपथपत्र सादर करावे.

३) मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

४) जातीचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा.

अ) अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता पालकाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २,००,०००/- (दोन लाख रु.) एवढी निश्चित करण्यात आली आहे.

ब) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता पालकाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १,००,०००/- (एक लाख रु.) एवढी निश्चित करण्यात आली आहे.

६) शिक्षणात खंड पडला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे Gap Certificate व शपथपत्र जोडणे आवश्यक आहे.

७) विद्यार्थ्यांचे त्याच जिल्ह्यातून महाविद्यालय बदलल्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाल्याच्या आदेश क्रमांकाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८) वडील हयात नसल्यास वडिलांचा मृत्यूचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

९) विद्यार्थिनीच्या बाबतीत (मुलीचे) लग्न झाले असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१०) विद्यार्थी खाजगी किंवा महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहत असल्यास वसतीगृह प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११) अर्जावर स्वतःचा नुकताच काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो असावा.

(आ) **शिष्यवृत्ती प्रकार व निकष :**

१) **राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती :** एस.एस.सी. परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण व त्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ६०००/- च्या आत आहे असे विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात.

२) **अल्पसंख्यक समाजातील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती :** अल्पसंख्यक समाजातील मुस्लिम, पारसी, शीख, ख्रिश्चन, बौद्ध समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना एस.एस.सी. परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण व २ लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीकरिता अर्ज करता येईल.

३) **आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शालान्त परीक्षोत्तर गुणवत्ता शिष्यवृत्ती :** उत्पन्न मर्यादा रु. ३०,०००/- असणाऱ्या विद्यार्थ्यांना तहसीलदाराच्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्रासह या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल.

४) **राज्य सरकारची खुली शिष्यवृत्ती :** उच्च माध्यमिक (एच.एस.सी.) परीक्षेत ६०% पेक्षा अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल.

५) **अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती :** जे विद्यार्थी शारीरिकृष्ट्या अपंग असतील अशा विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल.

६) **राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती :** ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना लागू आहे.

I) इयत्ता १०वी च्या परीक्षेत विशेष प्रावीण्य (७५% टक्के गुण किंवा त्यापेक्षा अधिक गुण) मिळवून

इयत्ता ११वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनु.जातीच्या मुलामुलींनी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीकरिता अर्ज कार्यालयात सादर करावा. भारत सरकार शिष्यवृत्तीच्या व्यतिरिक्त ही शिष्यवृत्ती मिळेल. यास पालकाच्या उत्पन्नाची अट नाही.

II) इयत्ता १०वी व १२वी च्या परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या (७५% टक्के गुण किंवा त्यापेक्षा अधिक गुण) मिळविणाऱ्या अनु.जाती, वि.जा., भ.ज., वि.मा.प्र. (SC, VJNT, SBT) प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार यासाठी राज्यात प्रथम, प्रत्येक बोर्डात प्रथम आणि जिल्ह्यात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावा.

### कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विशेष सूचना

१) पर्यावरण विषयाचे प्रकल्प लेखन संबंधित शिक्षकांकडून प्रमाणित करून नियोजित वेळेपूर्वी सादर करावे.

२) प्रवेशासंबंधी निर्णय प्रवेशसमिती (Admission Committee) घेईल. ते सर्वांसाठी बंधनकारक राहील.

३) जे विद्यार्थी महाराष्ट्राबाहेरून / परदेशातून या विभागातील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यास इच्छुक असतील त्यांनी सर्वप्रथम नागपूर विभागीय मंडळाकडून अर्ज निर्धारित किंमतीत अर्ज विकत घेऊन ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे प्रवेश घेण्यापूर्वी आवश्यक त्या कागदपत्रांसह सदर अर्ज सादर करावा.

४) शुल्क सवलत व शिष्यवृत्तीसंबंधी आवश्यक दाखले सत्रारंभी सादर करावे व तशी पावती घ्यावी.

५) विद्यार्थ्यांच्या दुर्वर्तनाची व नियमभंगाची चौकशी महाविद्यालयीन शिस्तपालन समितीकडून केल्या जाईल.

६) सर्व विषयांच्या घटकचाचणी, लेखी व तोंडी परीक्षेला उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

७) सर्व विषयांचे स्वाध्याय नोटबुक वेळोवेळी प्रमाणित करून घ्यावे.

८) महाविद्यालयातील फर्निचर इ. साहित्याच्या हानीबद्दल २ रु. प्रत्येक विद्यार्थ्यांकडून दरवर्षी कॉशन मनीमधून सत्राचे शेवटी कापून घेण्यात येईल.

९) इयत्ता ११वी परीक्षेत गणित व विज्ञान विषयासाठी लेखी परीक्षेत २५% गुण मिळविल्याशिवाय सवलतीचे गुण देण्यात येणार नाही.

१०) इयत्ता ११वी चा निकाल तयार करण्यासाठी प्रथम लेखी व द्वितीय सत्र लेखी परीक्षा यांचा ८०% आवश्यक गुणांचा विचार करण्यात येईल.

११) इ.११ वी प्रवेशाचेवेळी विद्यार्थी प्रगत / अप्रगत असल्याचे हमीप्रत जोडणे आवश्यक राहील.

### गणवेश

व्यवस्थापनाने महाविद्यालयाकरिता ठरविलेला गणवेश अनिवार्य राहिल.

### सवलती व शिष्यवृत्त्या

शासनाने मंजूर केलेल्या सर्व सवलती व शिष्यवृत्त्या शासनाच्या नियमाप्रमाणे मिळतील. त्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र व अर्ज मुदतीच्या आत कार्यालयात सादर करावे लागतील. अपूर्ण व उशिरा आलेल्या अर्जांचा विचार केल्या जाणार नाही.

### आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत :

१) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांनी आपले फी सवलतीचे अर्ज (ई.बी.सी. कन्सेशन) प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसाचे आत तहसीलदाराच्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या दोन प्रतिंसह कार्यालयात सादर करावेत.

## प्रवेश अर्ज

महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश सुविधा असल्याने खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

CBCS संदर्भात –

१) गोंडवाना विद्यापीठाच्या निश्चित धोरणाप्रमाणे सन २०१८–१९ पासून पदवीच्या बी.ए. व बी.एस्सी. प्रथम वर्षापासून ऐच्छिक विषयाच्या निवडीची श्रेयांक प्रणाली CBCS लागु झालेली आहे. तसेच सत्र २०२३–२४ पासून ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

२०२०′ लागु झाले आहे. विषय निवडी संदर्भात अधिक माहिती विद्यार्थ्यांनी प्रवेश समितीशी संपर्क साधून घ्यावी.

२) त्यातील प्रवेश अर्ज भरून केंद्रात ऑनलाईन फार्म भरावा. MSCIT केंद्रामध्ये/ग्रंथालयात स्वतः किंवा मदतीने भरावा. MSCIT केंद्रात ५० रु. जमा केल्यावर फॉर्म भरून दिल्या जाईल.

३) ऑनलाईन फॉर्मची प्रत व आवश्यक कागदपत्रे प्रवेश समितीकडे तपासून प्रवेश समिती प्रमुखाची सही घ्यावी.

४) फॉर्म भरताना स्वतःचे नाव व वडिलाचे, आईचे, आडनाव, जन्मतारीख, कॅटेगिरी, जात, ई–मेल आयडी, आधारकार्ड क्रमांक, बँक अकाउंट नंबर इत्यादी माहिती पडताळून पाहिल्यानंतरच फॉर्म सादर करावा. (ही जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.) ऑनलाईन प्रवेश अर्ज महाविद्यालयाची वेबसाईट (www.dmvn.ac.in) वर (http://sdmn.mastersofterp.in) या लिंकवर उपलब्ध आहे. प्रवेश घेतांना २ पासपोर्ट साईज कलर फोटो (मागे पूर्ण नाव) तसेच सर्व आवश्यक कागदपत्र सोबत ठेवावी.

**आवश्यक कागदपत्रांची सूची खालीलप्रमाणे आहे.**

१) टी.सी. (मुळप्रत व सत्यप्रत)

२) आधारकार्ड (सत्यप्रत)

३) गुणपत्रिका (मुळप्रत व सत्यप्रत)

४) कास्ट सर्टिफिकेट (सत्यप्रत)

५) महाविद्यालयाने निश्चित केलेल्या अर्जाच्या नमुन्यावर स्वतःच्या हस्ताक्षरात सर्व माहिती तसेच ऑनलाईन फॉर्मची प्रत सादर करावी. अर्जातील कोणताही रकाना अपूर्ण ठेवू नये. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६) महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रवेश अर्जासोबत प्रवेश शुल्क भरावे लागेल. कोणतेही शुल्क ३.०० वाजेपर्यंत स्वीकारले जाईल.

७) प्रवेश फी परत केली जाणार नाही. विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यावर तो महाविद्यालयात दाखल न झाल्यास भरलेली फी परत मिळणार नाही. एका विभागात प्रवेश मिळाल्यानंतर दुसऱ्या विभागात प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याला पुन्हा प्रवेश शुल्क व इतर सर्व शुल्क भरावे लागतील.

८) प्रवेशअर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ) या महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी शिकत असलेल्या शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांच्या किंवा प्राचार्यांच्या सहीचा शाळा सोडल्याचा दाखला.

ब) मुख्याध्यापकांच्या किंवा प्राचार्यांच्या सहीचे विद्यार्थी प्रवेश घेण्यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे प्रमाणपत्र.

क) एस.एस.सी. परीक्षेची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.

ड) ११ वीत ज्या शाखेमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाला त्याच शाखेत १२ वीला प्रवेश मिळेल.

९) प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्याला माहिती पत्रकात दिल्याप्रमाणे शुल्क भरावे लागेल.



## विवरण पत्रक २०२३-२४

### (कनिष्ठ महाविद्यालय)

या वर्षीचे नवे सत्र उन्हाळी सुट्यानंतर शासन निर्देशानुसार सत्रारंभ होईल.

१) २०२३-२४ या सत्रात पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जाईल.

**प्रवेश : अ) कला विभाग ( Arts Faculty)**

११ वी कला (मराठी माध्यम)

१२ वी कला (मराठी माध्यम)

**ब) विज्ञान विभाग (Science Faculty)**

११ वी विज्ञान (इंग्रजी माध्यम)

१२ वी विज्ञान (इंग्रजी माध्यम)

२) अभ्यासविषय :

विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे विषय घेता येतील. (Junior College च्या नवीन अभ्यासक्रमानुसार)

अ) **अनिवार्य विषयसमूह** : १) इंग्रजी २) मराठी

ब) **कला शाखा** : १) इतिहास २) राज्यशास्त्र ३) समाजशास्त्र किंवा सहकार४) अर्थशास्त्र

क) **विज्ञान शाखा** : १) रसायनशास्त्र (Chemistry) २) जीवशास्त्र (Biology) ३) भौतिकशास्त्र (Physics) ४) गणित (Mathematics) ५) समाजशास्त्र

२) १००० च्या आत लोकवस्ती असलेल्या गावात राहणाऱ्या विद्यार्थ्याला ग्रामपंचायत सरपंचाच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला द्यावा लागेल व १००० चे वर लोकवस्ती असणाऱ्या गावात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना तहसीलदाराच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला द्यावा लागेल. नायब तहसीलदाराची सही ग्राह्य ठरणार नाही.

३) प्रवेशित विद्यार्थ्यांना वडिलांच्या किंवा वडील नसल्यास कायदेशीर पालकांच्या नावाने (EBC) करिता अर्ज करावे लागतील. त्यांच्या स्वतःच्या सहीचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

४) ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील हयात आहे अशा विद्यार्थ्यांना आपल्या वडिलांच्या सहीने किंवा वडील नसल्यास आईच्या सहीने (EBC) सवलतीचा अर्ज करणे आवश्यक आहे. वडील नसल्यास मृत्यूचा दाखला आवश्यक आहे.

५) इ.बी.सी. सवलतीकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष आहे.

३) महाविद्यालयाच्या परीक्षा :

अ) कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे प्रत्येक विषयांच्या परीक्षांना उपस्थित राहून उत्तीर्ण व्हावे लागेल.

### वर्ग ११ वा

| | |
|---|---|
| प्रथम सत्र - घटक चाचणी (Unit Test) | द्वितीय सत्र - घटक चाचणी (Unit Test) |
| प्रथम सत्र परीक्षा (First Semester exam.) | द्वितीय सत्र परीक्षा (Second Semester Exam.) |

### वर्ग १२ वा

| | |
|---|---|
| प्रथम सत्र - घटक चाचणी (Unit Test) | द्वितीय सत्र - घटक चाचणी (Unit Test) |
| प्रथम सत्र परीक्षा (First Semester exam.) | द्वितीय सत्र परीक्षा (Second Semester Exam.) |

अ) वर्ग ११वीचे अंतिम परीक्षाफल वरील परीक्षांच्या सरासरी यशावर अवलंबून राहील.

ब) वर्ग ११वी च्या विद्यार्थ्यांना म.रा.मा.शि.मंडळाच्या परीक्षेला बसण्यापूर्वी सर्व परीक्षा शुल्क द्यावे लागेल. उपस्थित नियमांचे पालन न झाल्यास परीक्षेला बसता येणार नाही.

### विद्यार्थ्यांसाठी विशेष सुचना

१) प्रवेश घेताना आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे.

२) प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसाचे आत फी सवलत फॉर्म भरणे आवश्यक आहे. अडचणी व शंका असल्यास वेळोवेळी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# Committees for Session 2023-24
## Junior College

### Junior College Teacher

1. Ms. G. S. Parwate
   (M. A. B. Ed. English)
2. Mr. R. C. Dange
   (M. A. B. Ed. History)
3. Mr. S. V. Kumbhare
   (M. Sc. B. Ed. NET, Physics)
4. Mr. S. P. Borkar
   (M. A. B. Ed. Pol. Science, Marathi)
5. Ms. U. B. Wadpalliwar
   (M. A. B. Ed. Marathi)
6. Mr. P. S. Giradkar
   (M. A. M. Com. B. Ed. Economics, Co-operation)
7. Mr. M. P. Fulzele
   (M. Sc. B. Ed. Chemistry)
8. Ms. R. V. Devulwar
   (M. A. B. Ed. English)
9. Ms. P. W. Atram
   (M. Sc. B. Ed. Botany)
10. Ms. D. B. Pustode
    (M. Sc. B. Ed. Mathematics)
11. Mr. G. S. Gahane
    (M. A. B. Ed. Sociology, Marathi)

1. Supervisor
   Ku. G. S. Parvate

2. Time Table and Examination
   1) Mr. S. P. Borkar
   2) Mr. R.V. Devulwar

3. Grievence
   1) Mr. S. V. Kumbhare
   2) Ms. D. B. Pustode

4. Skill Development
   1) Ms. P. W. Atram
   2) Ms. D. B. Pustode

5. Games & Sports
   1) Mr. G. S. Gahane
   2) Ms. U. B. Wadpalliwar

6. N.S.S Unit (10+2)
   1) Mr. M. P. Fulzele
   2) Ms. U. B. Wadpalliwar

7. Cultural
   1) Mr. R. C. Dange
   2) Ms. G. S. Parwate
   3) Mr. P. S. Giradkar

8. News & Publication
   1) Mr. S. P. Borkar
   2) Ms. R. V. Devulwar

9. Admission
   1) Mr. S. V. Kumbhare
   2) Ms. G. S. Parwate
   3) Mr. M. P. Fulzele
   4) Mr. G. S. Gahane

10. Magazine
    1) Ms. R. V. Devulwar
    2) Ms. D. B. Pustode

11. Academic Planning
    1) Ms. G. S. Parwate
    2) Mr. S. V. Kumbhare

12. Student Council
    1) Mr. P. S. Giradkar
    2) Mr. R. C. Dange

### Jr College Class Teaching Staff (2023-24)

| Class | Name of Class Teacher |
|---|---|
| XI Arts A | Ms. P. S. Girdakar |
| XI Arts B | Mr. R. V. Devulwar |
| XII Arts A | Ms. U. B. Wadpalliwar |
| XII Arts B | Ms. G. S. Gahane |
| XI Sci | Ms. P. W. Atram |
| XII Sci | Mr. S. W. Kumbhare |



## विवरण पत्रक २०२३-२४

(वरिष्ठ महाविद्यालय)

या वर्षी उन्हाळी सुट्टीनंतर शासन निर्देशानुसार सत्रारंभ होईल. चालू शैक्षणिक सत्रासाठी पुढील वर्गात प्रवेश घेता येईल.

१) २०२३ – २४ या सत्रात पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जाईल.

### अ) कला शाखा

**प्रथम वर्ष : बी.ए.** (Semester I & II -As per National Education Policy 2020)

**द्वितीय वर्ष : बी.ए.** (Semester III & IV, Choice based credit system)

(वरीलप्रमाणे प्रथम वर्ष कला करिता घेतलेले विषय बदलविता येणार नाही.)

**तृतीय वर्ष : बी.ए.** (Semester V & VI - Choice based credit system)

(वरीलप्रमाणे प्रथम वर्ष कला करिता घेतलेले विषय बदलविता येणार नाही.)

* M.A. (कला शाखा)
पदव्युत्तर प्रथम व द्वितीय वर्ष
१. इतिहास
२. राज्यशास्त्र
३. अर्थशास्त्र
४. समाजशास्त्र (प्रथम वर्ष)

### ब) वाणिज्य शाखा (Semester I & II -As per National Education Policy 2020)

(वाणिज्य स्नातक भाग १) (वाणिज्य स्नातक भाग २) (वाणिज्य स्नातक भाग ३)

### क) विज्ञान शाखा

**B.Sc.-I** (Semester I & II -As per National Education Policy 2020)

**B.Sc.-II** (Semester III & IV, Choice based credit system)

1) Chemistry 2) Physics 3) Mathematics

OR

1) Chemistry 2) Botany 3) Zoology

**B.Sc.-III (Semester V & VI - Choice based credit system)**

**1)** Chemistry **2)** Physics **3)** Mathematics **OR 1)** Chemistry **2)** Botany **3)** Zoology

(Note : The subjects chosen for BSc. I will not be changed further)

B.Sc. Computer Science

* MSc.
(Post Graduation)
I & II year for
Zoology
Physics
Chemistry
Botany

A) **B.A. Part-I & B.Sc. Part-I**

For Admission to this class a student should have passed Higher Secondary (Class XII) Examination of the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education.

B) **B.A. Part-II & B.Sc. Part-II**

Student Should have passed his Semester-I & Semester - II of pervious year.

C) B.A. Part-III & B.Sc. Part-III

Student should have passed his B.A.-II or B.Sc.-II.

D) **पदवी कला व विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदव्युत्तर प्रथम वर्षाला प्रवेश मिळेल.**

**गोंडवाना विद्यापीठातील पदवी कला व विज्ञान शाखेसाठी** CBCS **व प्रथम वर्षासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रणाली लागू असल्याने विद्यार्थ्यांसाठी विशेष सूचना.**

**1) B. A. Sem ll** **2) B. Sc. Sem IV**

(Subject of "Democracy, Elections and Good Governance" is mandatory for students)

**1) B. A. Sem I** **2) B. Sc. Sem III**

(Environment Science is a compulsory subject for students)

**1) B. A. Sem V** **2) B. A. Sem VI**

(The subject "General Research Methodology" is mandatory for students.)

**1) B. Sc. Sem V** **2) B. Sc. Sem VI**

"Skill Enhancement Course." is mandatory.

**वरील सर्व सत्रातील विद्यार्थ्यांनी त्या त्या विषयाच्या समन्वयकाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. त्यातील अध्यापन, परीक्षा, प्रकल्प लेखन ही प्रक्रिया पूर्ण करावी. या विषयाचे गुण विद्यापीठाला सादर करावे लागतात. त्याशिवाय विद्यापीठाची पदवी विद्यार्थ्यांना मिळणार नाही.**

## प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Courses)

Students from any stream (UG/PG) can apply for these courses

1. Vermiculture
2. Apiculture
3. Mushroom Culture
4. Solar Technology
5. Soil Testing
6. स्पर्धा परीक्षेचे मराठी व्याकरण
7. English Grammar and Communication Skills.
8. Event & Hospitality Management
9. Accounting
10. Wild Life Tourism

**Centre for Higher Learning and Research**
**( उच्च शिक्षण आणि संशोधन केंद्र)**
**Zoology**
**Physics**
**Economics**





## विद्यापीठ शुल्क व विविध प्रमाणपत्र शुल्क

| | | |
|---|---|---|
| 1. | Bonafide Certificate | - 10/- |
| 2. | College Leaving Certificate | - 50/- |
| 3. | Duplicate Transfer Certificate | - 50/- |
| 4. | Character and Date of Birth Certificate | - 10/- |
| 5. | Charges for obtaining Old Record Document | - 20/- |
| 6. | Duplicate Identity Card | - 20/- |
| 7. | Duplicate Library Ticket | - 20/- |

**✲ मूळ टी.सी. गहाळ झाल्यास डुप्लिकेट टी.सी.करिता तहसीलदाराचे शपथपत्रासह अर्ज करावा.अर्ज दिल्यापासून पाच दिवसात डुप्लिकेट टी.सी. मिळेल.**



## POST GRADUATE (ARTS)

### M.A. Political Science

(Semester I & II -As per National Education Policy 2020)

**Sem-III**

Paper 1- Indian democracy and political process
Paper 2- pressure groups and social movements
Paper 3- International law
Paper 4- Diplomacy and foreign policy

**Sem-IV**

Paper 1- Modern political ideologies
Paper 2- State politics in India
Paper 3- Human Rights: Problems and Prospects
Paper 4- Globalization and Its impact on the political system

### M.A. History

(Semester I & II -As per National Education Policy 2020)

**Sem-III**

Paper-1 Emergence of Maratha Power in 17th century.
Paper-2 State in Ancient and Medieval India.
Paper-3 Elective Economic History of India: (1757-1857)
Paper-4 Foundation course-History of Medieval Vidarbha.

**Sem-IV**

Paper-1 Expansion of Maratha power: (1707-1818).
Paper-2 State in British India.
Paper-3 Elective Economic History of India :( 1858-1947)
Paper-4 History of Modern Vidarbha.

### M.A. Economics

(Semester I & II -As per National Education Policy 2020)

**Sem-III**

Paper-1 Economic Development & Growth I
Paper-2 International Trade & Finance I
Paper-3 Research Methodology I
Paper-4 Money and Banking

**Sem-IV**

Paper-1 Economic Development & Growth II
Paper-2 International Trade & Finance II
Paper-3 Research Methodology II
Paper-4 Rural Development
Note: From above Paper 1 and 2 are Compulsory Subjects and Paper 3 and 4 are Optional Papers

## POST GRADUATE (SCIENCE)

### M.Sc. Zoology

(Semester I & II -As per National Education Policy 2020)

**SEM III**

Paper I Parasitology and Immunology
Special Group
Paper I Entomology-I/Cell biology-I/ Animal Physiology-I/ Aquaculture-I/ Environmental biology-I (any one)
Paper II Entomology-II/Cell biology-II/ Animal Physiology-II/ Aquaculture-II/ Environmental biology-II (any one)
Foundation course
Paper I Basic Entomology/Elementary zoology/ Human Physiology(any one)

**SEM IV**

